महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • पालघर • रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ३० सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ०९८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


# ३४ आगार प्रमुखांवर कारवाई ?

## पूर परिस्थितीत मुख्यालयातील गैरहजेरी भोवणार

**आगारप्रमुख हा एसटी प्रशासनाचा मुख्य घटक आहे. त्याच्या हाताखाली शेकडो कर्मचारी काम करत असतात. तो ज्या आगारात कार्यरत असतो, तेथे अनेक बसेस रात्रपाळीला मुक्कामी असतात. लाखो रुपये किमतीचे ऑइल, इंधन व इतर सुटे भाग तिथे असतात. याबरोबरच तिकीटविक्री मधून आलेली मोठी रक्कम देखील आगारात ठेवण्यात आलेली असते. अशा परिस्थितीमध्ये एक पालक म्हणून आगारप्रमुखांवर मोठी जबाबदारी असते. त्याने आगारात दररोज उपस्थित राहून या सर्वांना मार्गदर्शन करणे व त्यांच्यावर अंकुश ठेवणे गरजेचे असते. परंतु काही आगारप्रमुख हे आपल्या आगारात उपस्थित नसल्याचे गोपनीय अहवालात स्पष्ट झाले होते. कर्तव्यात कसूर करून बेजबाबदार वर्तन करणाऱ्या आगरप्रमुखांच्यावर प्रशासन लवकरच कारवाई करेल. यापुढे अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत अशी दक्षता एसटी प्रशासनाने घ्यावी असे निर्देश सरनाईक यांनी दिले.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात परतीच्या पावसामुळे अतिवृष्टीचे गंभीर संकट आणि पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अशा गंभीर परिस्थितीमध्ये आपल्या मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना देखील एसटी महामंडळाच्या २५१ पैकी ३४ आगारातील आगरप्रमुख हे आपल्या कर्तव्यावर हजर नसल्याचे एका गोपनीय अहवालामध्ये निष्पन्न झाले. ही अत्यंत गंभीर बाब असून, बेजबाबदार वर्तन करुन आपल्या कर्तव्यात हलगर्जीपणा दाखवणाऱ्या आगारप्रमुखांवर तातडीने कारवाई करण्यात यावी. तसेच अशाप्रकारचे बेजबाबदार वर्तन भविष्यात खपवून घेतले जाणार नाही, असा सज्जड दम परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिला.

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. विशेषतः मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक रस्ते बंद आहेत. पुलावर पाणी आले आहे. अशा परिस्थितीमध्ये एसटीची वाहतूक अनेक ठिकाणी ठप्प झाली

### शहापूर, मुरबाड, भिवंडी एसटी आगार व्यवस्थापकांवर कारवाई

आहे. अनेक प्रवासी बसस्थानकावर अडकून पडले आहेत. अशा गंभीर परिस्थितीमध्ये आपल्या मुख्यालयात हजर राहून आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडण्याऐवजी काही आगारप्रमुख कर्तव्यावर गैरहजर असल्याचे दिसून आले आहे. या आगारप्रमुखांनी परिस्थितीचे गांभीर्य न ओळखता अत्यंत बेजबाबदार वर्तन केले आहे. अशाप्रकारे आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या आगारप्रमुखांना संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कारणे दाखवा नोटीस तातडीने बजावली पाहिजे. त्यामध्ये त्यांचा खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्यावर प्रमादीय कारवाई करण्यात येईल. तसेच हे आगारप्रमुख ज्या विभाग नियंत्रकांच्या अखत्यारित काम करतात, त्या विभाग नियंत्रकांना देखील याबाबत विचारणा केली जाणार आहे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

लक्षवेधी



## बदलापूर : फेरीवाल्यांवर कारवाई दरम्यान वाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाची कारवाई सोमवारी पश्चिम भागात सुरू असताना अनपेक्षित वादंग निर्माण झाला. कारवाईदरम्यान एका परप्रांतीय फेरीवाल्याने पालिका कर्मचाऱ्यांशी वाद घातला. त्यावेळी संबंधित फेरीवाला पालिका कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून गेला. इतर कर्मचाऱ्यांनी हा वाद रोखला. त्यावेळी या फेरीवाल्याने मराठी भाषेबाबत अपशब्द उच्चारल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी तत्काळ धडक कारवाई करत संबंधित फेरीवाल्याला बेदम चोप दिला. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

बदलापुरात गेल्या काही दिवसांपासून फेरीवाल्यांची संख्या वाढली आहे. शहरातील विविध रस्ते फुटपाथ फेरीवाल्यांनी गिळंकृत केले आहेत. या फेरीवाल्यांमुळे रहदारीला त्रास होत असून रस्त्यावर वाहतुकीची कोंडी वाढत आहे. यातील बहुतांश फेरीवाले हे शहराबाहेरून येत असून ते या शहरातून आपला व्यवसाय करत आहेत. यासाठी बहुतांश फेरीवाल्यांना स्थानिक राजकीय पुढार्यांचा फायदा मिळत असल्याचं बोललं जात आहे.



## मालमपट्टीनंतर सापगाव येथील भातसा नदी पूल वाहतुकीसाठी खुला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - मुसळधार पावसामुळे रविवारी संध्याकाळी शहापूर जवळील सापगाव येथील भातसा नदी पुलावरून पाणी वाहत होते. या वेगवान प्रवाहामुळे पुलावरील डांबरी रस्त्याचे थर वाहून गेले. त्यामुळे सोमवारी सकाळी या पुलावरील खराब रस्त्यावरून वाहने जावू देणे धोक्याचे असल्याने पोलिसांनी सोमवारी सकाळी पुलावरून जाणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद केली होती. परंतु, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दुपारी पुलाची पाहणी केली. आवश्यक दुरुस्ती केल्यानंतर भातसा नदीवरील पूल दुपारी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. शहापूर तालुक्यातील सुमारे दीडशे गावांना जोडणारा हा पूल आहे.

# गोवेली ग्रामीण रुग्णालयात ‘स्वस्थ नारी सशक्त परिवार’ अभियान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शासनाने जाहीर केलेल्या'स्वस्थ नारी, सशक्त परिवार, अभियानाची सुरुवात आज ग्रामीण रुग्णालय गोवेली येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ आशा मुंजाळ यांच्या प्रमुख उपस्थितीतीत आणि जेष्ठ पत्रकार जैतू मुठोलकर व रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ दिपलक्ष्मी मेश्राम यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून झाली,




यावेळी रुग्ण कल्याण समितीचे सदस्य रामदास लोणे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अमोल सुरोशी, गोवेली ग्रामपंचायतीच्या माझी सरपंच सुरेखा भोईर, उपसरपंच श्री घुडे, विस्तार अधिकारी श्री सांबरे, बालरोगतज्ज्ञ डॉ उज्वल जाधव, प्रशासकीय प्रमुख सुनील डोंगरे, सर्व वैद्यकीय विभागाचे प्रमुख, व कर्मचारी उपस्थित होते. महिलांचे आरोग्य आणि सक्षमीकरण हे कुंटूब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. या उद्देशाने भारत सरकारच्या आरोग्य आणि कुंटूब कल्याण मंत्रालयामार्फत तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनामार्फत 'स्वस्थ नारि, सशक्त परिवार, हे राष्ट्रीय अभियान १७सप्टेंबर ते२ऑक्टोबर२०२५दरम्यान संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे.या अनुषंगाने आज ग्रामीण रुग्णालय गोवेली येथे आज त्याची सुरुवात करण्यात आली, यावेळी रक्तदान शिबीर, दंत तपासणी, डोळे तपासणी, रक्तदाब, इत्यादी विविध तपासण्या करून तज्ञ वैद्यकीय अधिकां-याच्या सल्यानुसार औषधोपचार करण्यात आला, यावेळी गरोदर महिलांना'एमसीपी, कार्ड वाटप करण्यात आले, सकस व पोषण आहाराचे महत्त्व पटावे व फास्ट फूड मुळे काय धोका निर्माण होतो, याची उत्तम मांडणी, प्रदर्शन भरविण्यात आले होते, याची पाहणी तालुका आरोग्य अधिकारी व पाहुण्यांनी केली, याप्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ दिपलक्ष्मी मेश्राम यांनी या अभियानबद्दल माहिती दिली. सुमारे ४५२ रुग्णांनी शिबीराचा लाभ घेतला.

## पुरग्रस्त शेतकऱ्यांना आमदार किसन कथोरे यांचे भावनिक आवाहन

**माझ्या मतदार संघातील शेतकरी बांधवांनो,**
**सप्रेम नमस्कार,**

गेल्या २-३ दिवस सतत मुसळधार पाउस पडत आहे, या पावसाने हाती आलेल्या खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ही नैसर्गिक आपत्ती आहे. या अवेळीच्या पावसामुळे शेतीच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, त्याच बरोबर शेतीच्या बांधांच पण नुकसान झाले आहे तसेच काही ठिकाणी अतिवृष्टि मुळे घरे पडलेली आहेत. त्याबाबत संबंधित तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकाऱ्याना सरसकट पंचनामे करण्याचे आदेश देन्यात आले आहेत.

तरी शेतकरी बांधवानी आपल्या शेती पिकाचे, व , घरांचे झालेल्या नुकसाणीचे पंचनामे त्वरित करुण घ्यावेत, या नैसर्गिक आपत्ती च्या कठिण परिस्थितित मी आपल्या सोबत आहे. नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी पंचनामे करताना काही अड़चण असल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा.



**आपला**
**श्री किसन कथोरे**
**(आमदार मुरबाड विधानसभा)**



# बारवी धरणाची हॅटट्रिक

## यंदाच्या मोसमात तिसऱ्यांदा ओव्हरफ्लो

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. २९ :** बदलापूरजवळील बारवी धरण यंदा पावसाळी मोसमात तिसऱ्यांदा ओव्हरफ्लो झाले असून, सर्व दरवाजांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. हे नयनरम्य दृश्य टिपण्यासाठी बारवी धरण परिसरात पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे. ठाणे जिल्ह्यासह मुरबाड, कल्याण, डोंबिवली येथून पर्यटकांनी बारवीकडे सायंकाळी मोठ्या संख्येने धाव घेतली. बदलापूरपासून सुमारे सात ते आठ किमी अंतरावर असलेल्या या धरणात सततच्या मुसळधार पावसामुळे पाणीसाठा वाढला आहे. यामुळे बारवी नदी दुथडी भरून वाहत आहे. धरणाच्या स्वयंचलित दरवाजांमधून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने परिसर अधिकच आकर्षक झाला आहे. बारवी धरणाच्या काठावरचे धबधबे, ओसंडून वाहणारी नदी, आणि धरणाचा आवाज - हे सर्व पर्यटकांसाठी आकर्षण ठरत असून, अनेकांनी मोबाईलमध्ये फोटो आणि व्हिडिओ कैद करत धरण परिसराचा आनंद घेतला, मात्र यामुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडीही झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. हवामान खात्याने पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने प्रशासनाने धरण परिसर व नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. पाणीपातळी अधिक वाढल्यास नदीकाठच्या गावांमध्ये पूरस्थिती उद्भवू शकते, याचा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. बारवी धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ परिसरातील नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. पावसाळ्याच्या शेवटीही धरण काठोकाठ भरल्याने, पुढील काही महिन्यांसाठी जलसाठा पुरेसा असल्याचे संकेत मिळाले आहेत.

# भिवंडी ड्रग्ज माफियांना पोलिसांचे अभय!

## खा. सुरेश म्हात्रे यांचा आरोप



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : भिवंडी शहर सध्या ड्रग्जच्या विळख्यात सापडले असून, अनेक तरुणांना या विषारी जाळ्यात अडकवणाऱ्या ड्रग्ज माफियांवर तत्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खा. सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांनी ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत शुक्रवारी केली. मुंबईला पळून गेलेला ड्रग्ज माफिया पोलिस अधिकाऱ्यांना माहीत असून त्याला पोलिसांचेच अभय आहे, असा आरोपही त्यांनी केला.

'भिवंडीतील अनेक लहान मुले महामार्गावरून होणाऱ्या ट्रकच्या वाहतुकीच्या माध्यमातून ड्रग्जच्या आहारी गेले आहेत. पंधरा दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात एक महिला भेटली. तिचा १७ वर्षांचा मुलगा ड्रग्जच्या आहारी गेला होता. भिवंडीत ड्रग्स पुरवठा करणारा मुख्य डीलर मुंबईला पळून गेला असून, अजूनही त्याचे काही साथीदार भिवंडीमध्ये सक्रिय आहेत. त्यांच्यावर तत्काळ कारवाई करा आणि भिवंडी शहराला ड्रग्जच्या विळख्यातून वाचवा' असे साकडे म्हात्रे यांनी घातले. पालकमंत्री व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांनी तत्काळ कठोर कारवाईचे आदेश दिले. भिवंडीतील ड्रग्ज डिलरची माहिती पोलिसांना असल्याचे म्हात्रे त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून देताच सभागृह अवाक् झाले.

भिवंडीतील ट्रक पार्किंग प्रकल्पाचा प्रस्ताव पर्यावरण विभागाकडे प्रलंबित आहे. शासनाने या प्रकल्पात ४० टक्के सहकार्य करावे', अशी मागणी त्यांनी केली. वराळादेवी तलाव प्रकल्पाला केंद्र सरकारप्रमाणे राज्य शासन व भिवंडी महापालिकेने निधी देण्याची मागणीही म्हात्रे यांनी केली.

परिस्थिती विदारक आहे. शाळकरी आणि महाविद्यालयीन मुलेही ड्रग्जच्या आहारी गेली आहेत. त्यामुळे ड्रग्ज माफियाला गजाआड करणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु, ड्रग्ज माफियाला पोलिसांचे अभय असल्याचा आरोप त्यांनी केला.







## वाचक मनोगत

# आयुष्यभराचे कष्ट एका क्षणात वाहून गेले

राज्यात यावर्षी मान्सूनने दगडधोंड्यांप्रमाणे बरसत शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. ज्या पावसाची आतुरतेने वाट पाहिली जाते, त्याच पावसाने शेतकऱ्यांच्या घरी आज हवालदिल वातावरण निर्माण केले आहे. अतिवृष्टी, मुसळधार सरी, ढगफुटीच्या घटनांनी शेतातील पिके अक्षरशः वाहून गेली. मराठवाडा, खान्देश, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या सर्वच भागांतील शेतकरी संकटाच्या गर्तेत आहेत. नांदेड, यवतमाळ, हिंगोली, परभणी, लातूर, बीड, औरंगाबाद, वाशिम, बुलढाणा या जिल्ह्यांत १७ लाख हेक्टरांहून अधिक शेती मातीमोल झाली. कपाशी, सोयाबीन, तूर, मका, बाजरी, भुईमूग, भाजीपाला, ऊस या पिकांचा अक्षरशः चिखल झाला. हजारो कोटींचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे; मात्र खरी परिस्थिती त्याहीपेक्षा गंभीर आहे.

शेतकऱ्यांचे आयुष्यभराचे कष्ट, घेतलेले कर्ज, खरेदी केलेले बी-बियाणे, औषधे, खतांचा खर्च, सगळे एका क्षणात पाण्यात गेले. यंदा नैऋत्य मान्सूनचे अपेक्षेहून थोडे आगंतुकच आगमन झाले. मे महिन्यातील मान्सून पूर्व पावसाने एक महिना अगोदरच सगळीकडे पावसाळी वातावरण निर्माण झाले होते. यंदा वार्षिक सरासरीहून थोडा अधिक पाऊस होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. प्रत्यक्षात ढगफुटीसदृश पाऊस झाला. ऑगस्टमध्येच सरासरी ओलांडली. सगळे जलसाठे भरले. नदी-नाले काठोकाठ भरून वाहू लागले. पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटला; परंतु अन्नधान्याची नासाडी झाल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. मुसळधार पावसाने शेतजमीन खरडून गेल्याने जमिनीची सर्जनक्षमताच नष्ट झाली. परतीच्या पावसाचे असे रौद्ररूप यापूर्वी कधी पाहिले नव्हते. धाराशिव जिल्ह्यातील वाशी गावात तर परवा दोन तासांत तब्बल २२० मि.मी. पाऊस झाला! ही ढगफुटी होती. ढगफुटीच्या अशा घटनांची अनेक ठिकाणी पुनरावृत्ती दिसून आली.

विमा कंपन्यांच्या फायद्यासाठी बनवलेल्या गुंतागुंतीच्या अटी शेतकऱ्यांना फक्त निराश करतात. सरकारी यंत्रणेची वेळकाढू भूमिका आता असह्य झाली आहे. मदत देताना राजकीय सोयी, मतदारसंघनिहाय समीकरणे आणि नोकरशाहीची कासवगती यांमुळे खरी मदत लाभार्थ्यांपर्यंत वेळेवर पोहोचत नाही. अनेकदा मदत मिळेपर्यंत शेतकरी आत्महत्येच्या टोकावर पोहोचतो. त्याची जबाबदारी कोण घेणार? राज्य शासनाने आता शब्दांच्या आणि घोषणांच्या पलीकडे जाऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे. वर्ष २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मदतीचे निकष बदलून दुप्पट दराने नुकसानभरपाईचा निर्णय झाला होता. मात्र, तो निर्णय जून २०२५ मध्ये विद्यमान सरकारने बदलला.

(मार्च २०२३ च्या) जुन्या निर्णयाप्रमाणेच नुकसानभरपाईचे दर लागू केल्यामुळे यावर्षी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अत्यल्प नुकसान भरपाई मिळणार आहे. पेरणीसह बियाणे, खतांच्या किमतींमध्ये वाढ झालेली असताना, जुन्या दरामुळे मिळणारी भरपाई तुटपुंजी असेल. तातडीने पंचनामे पूर्ण करून योग्य ती नुकसानभरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली पाहिजे. पीकविमा योजनेच्या त्रुटी दूर करून शेतकऱ्यांसाठी सोपी व प्रभावी प्रणाली उभारली पाहिजे. खरिपाचे पीक पाण्यात गेले. जोपर्यंत शेतातील पाण्याचा निचरा होत नाही, तोपर्यंत रब्बीच्या हंगामाची तयारी करता येत नाही. सणासुदीचे दिवस आहेत. दसरा-दिवाळी हे सण तोंडावर आले आहेत. तेव्हा सरकारने नेहमीचे निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या खात्यावर तत्काळ काही रक्कम जमा करण्याची गरज आहे. सरकारने तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करून मदतीचा हात पुढे करावा. पाऊस बरसून गेला. आता पाळी सरकारची आहे, पावसाने केलेल्या नुकसानाची भरपाई करण्याची!

**माधव चौधरी**
**हिंगोणे – जळगाव**

## नवरात्रि 2025

### नववा दिवस : नववी माळ

# आजची देवी : श्री सिद्धिदात्री



नवरात्र हा भारतातील सर्वात महत्वाचा आणि शुभ सण आहे. जगभरातील हा सण साजरा केला जातो. जो दुर्गा देवीच्या नऊ रूपांना समर्पित आ हे. नवरात्री हा शब्द संस्कृत भाषेतून आला आहे. नव' म्हणजे 'नऊ' आणि 'रात्री' म्हणजे 'रात्र'. तर नवरात्री देवीची 9 रूपे कोणती आहेत जाणून घ्या. शरद ऋतूत महत्त्वाचे सण म्हणजे नवरात्रोत्सव, दसरा, कोजागिरी पौर्णिमा, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा, भाऊबीज... असे येतात. सुरुवात होते आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून, म्हणजे घटस्थापनेपासून. आदिमाया, आदिशक्तीच्या उपासनेचे नऊ दिवस म्हणजे नवरात्रींचा उत्सव. या उत्सवाची रंगत सर्व उत्सवांपेक्षा वेगळी आहे. घरात, मंदिरात, मंडपात दुर्गामातेची प्रतिष्ठापना करतात. या उत्सवाचा संबंध थेट बळिराजाच्या कष्टाशी आहे, कष्टकरी शेतकऱ्यांच्या साध्याभोळ्या संस्कृतीशी आहे. घटस्थापना म्हणजे बीजपरीक्षण! वावरात जी पिकं घेतली जातात, त्यापासून अन्नधान्य मळतं. त्या काळ्या आईच्या उपकारांची जाणीव ठेवणं, कृषिवलांचे ऋण मान्य करणं, कृतज्ञता मानणं, धन्यवाद देणं म्हणून हे नऊ दिवस! नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये आदिशक्ती दुर्गेच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. ही नऊ रूपे नवदुर्गा म्हणून ओळखली जातात.

## सिद्धिदात्री

देवी सिद्धिधात्री हे कमळावर विराजमान असलेल्या दुर्गेचे शेवटचे रूप आहे. तिला चार हात आहेत आणि तिच्या हातात गदा, चकती, पुस्तक आणि कमळ आहे. तिचा आवडता रंग गुलाबी आहे. ही दुर्गेची नववी शक्ती आहे. ती सर्व प्रकारच्या सिद्धी प्रदान करते. माँ सिद्धिदात्रीला चार हात आहेत. तिचे वाहन सिंह आहे. ती कमळाच्या फुलावर देखील बसते. तिच्या उजव्या खालच्या हातात कमळाचे फूल आहे. तिला कमलाराणी असेही म्हणतात. माता सिद्धिदात्री भक्त आणि साधकांना या सर्व सिद्धी देण्यास सक्षम आहे. देवी पुराणानुसार, भगवान शिव यांनी त्यांच्या कृपेने या सिद्धी प्राप्त केल्या. त्यांच्या कृपेनेच भगवान शिवाचे अर्धे शरीर देवीचे बनले. म्हणूनच त्यांना "अर्धनारीश्वर" (अर्धनारीश्वर) असे म्हटले जाऊ लागले.

पौराणिक मान्यतेनुसार, एकेकाळी संपूर्ण विश्वावर अंधार पसरला होता. त्या अंधारात प्रकाशाचा एक छोटासा किरण दिसला. हळूहळू, हा किरण मोठा होत गेला आणि नंतर तिने एका दिव्य स्त्रीचे रूप धारण केले. माता सिद्धिदात्री प्रकट झाली आणि ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींना जन्म दिला. ही ती देवी आहे जिची शिव पूजा करत होते. तिने त्यांना सिद्धी दिली. या कारणास्तव, देवी भगवतीच्या नवव्या रूपाला माता सिद्धिदात्री म्हणतात. सिद्धिदात्रीच्या कृपेनेच शिवाचे अर्धे शरीर देवीचे बनले, ज्यामुळे त्यांचे नाव अर्धनारीश्वर पडले. दुसऱ्या एका आख्यायिकेनुसार, जेव्हा सर्व देवदेवता महिषासुराच्या अत्याचाराने त्रस्त झाले, तेव्हा त्यांनी त्रिमूर्तींचा आश्रय घेतला. तिन्ही देवतांनी (ब्रह्मा, विष्णू आणि महेश) त्यांच्या तेजातून देवी सिद्धिदात्रीला जन्म दिला. त्यानंतर, सर्व देवतांनी तिला त्यांची शस्त्रे दिली आणि देवीने युद्ध करून महिषासुराचा पराभव केला. नवरात्रीच्या शेवटच्या दिवशी, तुपाचा दिवा लावणे आणि देवी सिद्धिदात्रीला कमळाचे फूल अर्पण करणे शुभ मानले जाते. पूजेनंतर, हवन (अग्निबलि) करून, कुमारिकेची पूजा करून, अन्नदान करून आणि ब्राह्मणाला जेवण देऊन विधी पूर्ण केला जातो. देवी सिद्धिदात्रीला नैवेद्यः नवरात्रीच्या नवमीच्या दिवशी, तीळ अर्पण करा आणि ब्राह्मणाला दान करा. यामुळे मृत्यूच्या भीतीपासून मुक्तता मिळेल.

जागर आदिशक्तीचा

# ७८व्या निरंकारी संत समागमाच्या सेवांचा शुभारंभ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** सेवाभाव समर्पण आणि मानवतेच्या दिव्य उत्सवाचे स्वरूप होऊ घातलेल्या 78व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या ग्राउंड सेवांचा शुभारंभ रविवारी सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या हस्ते निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे करण्यात आला. हा संत समागम 31 ऑक्टोबर ते 3 नोव्हेंबर, 2025 दरम्यान आयोजित होणार आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वार्षिक निरंकारी संत समागमाच्या सेवांची सुरुवात एका अत्यंत भावपूर्ण क्षणाने झाली. यावेळी मिशनची कार्यकारिणी समिती, केंद्रीय सेवादल अधिकारी तसेच हजारो भाविक भक्तगण सेवाभावनेने तन्मय होऊन उपस्थित होते. या भव्य दिव्य आयोजनाच्या पूर्वतयारीच्या सेवांमध्ये भाग घेण्यासाठी संपूर्ण देशातीलच नव्हे तर मुंबई व महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने सेवादल स्वयंसेवक व अन्य सेवादार भक्त समालखा स्थित निरंकारी आध्यात्मिक स्थळाकडे रवाना झाले आहेत.

समागम सेवांच्या शुभारंभ प्रसंगी हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या दर्शनाभिलाषी श्रद्धाळूंना संबोधित करताना सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज म्हणाल्या, "आज समागम सेवांच्या पावन प्रसंगी येथे येऊन मला अत्यंत आनंद होत आहे. प्रत्येकाच्या मनात जो उत्साह आहे, त्याचे सुंदर रूप अनुभवायला मिळत आहे.

निःसंशयपाने सत्संग आणि सेवा करताना प्रत्येक मन भक्तिमय होत आहे. आपण प्रत्येकामध्ये या एका परमात्म्याचेच रूप पहायचे आहे. कुठल्याही प्रकारचा अभिमान न ठेवता, सर्वांचा सन्मान करत सेवेला स्वीकारायचे आहे. निराकाराचे नामस्मरण करत या परमात्म्याशी सदैव जुडून राहायचे आहे."

सुमारे ६०० एकरमध्ये पसरलेले हे समागम स्थळ सेवा, श्रद्धा आणि मानवतेचे प्रतीक आहे. येथे लाखो भक्तांच्या निवास, भोजन, आरोग्य, वाहतूक आणि सुरक्षेच्या सर्व व्यवस्था पूर्ण श्रद्धा व निस्वार्थ भावनेने केल्या जातात. देश-विदेशातून आलेले संतजन, सेवेत असलेले महात्मा आणि प्रत्येक वर्गातील श्रद्धाळू या महाउत्सवात सहभागी होऊन एकत्व, समर्पण आणि आत्मिक आनंदाचा अनुभव घेतात.



# रायगड जिल्ह्यात शिक्षण संस्थांचा स्वच्छता उपक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जन शिक्षण संस्थान रायगड व रघुकुल शिक्षण प्रसारक संस्था यांच्या माध्यमातून सोमवार 29 सप्टेंबर 2025 रोजी " न्यू-पनवेल " येथे "स्वच्छता श्रमदान व कापडी पिशव्यांचे वाटप" करण्यात आले, तसेच कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वछ्तेची शपथही देण्यात आली.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष सौ. रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम स्वच्छता ही सेवा उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणार आहेत अशी माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली आहे. "कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार" यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील 20 वर्ष पासून सक्रिय पणे सुरु आहे व आता पर्यंत 70 हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे. याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून " न्यू-पनवेल " ह्या ठिकाणी "स्वच्छता श्रमदान व कापडी पिशव्यांचे वाटप" या उपक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ. कल्पना म्हात्रे, प्रशिक्षक श्री भारतभूषण पाटील,सौ गायत्री पाटील व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ मध्ये

# फॉरेन्सिक युनिट व व्हॅनाचे उद्घाटन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी) :** ठाणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ च्या कार्यालयीन इमारतीमध्ये फॉरेन्सिक युनिट व फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन ठाणे अपर पोलीस आयुक्त विनायक देशमुख यांच्या हस्ते

करण्यात आले. या प्रसंगी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलीस आयुक्त विजय मराठे, सचिन सांगळे यांच्या सह वरिष्ठ पोलीस निरीक्षक व फॉरेन्सिक टिम तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.उपस्थित होते.ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम कार्यक्रम करण्यात आला. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 कायदयाच्या अंमलबजावणीकरीता व गृह विभाग शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यात एकुण 259 मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन कार्यान्वित करण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन प्रकल्पाचे लोकार्पण सोहळा नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे. भिवंडीतील सदर फॉरेन्सिक युनिटमध्ये प्रशिक्षित स्टाफ नेमण्यात आलेला असून फॉरेन्सिक व्हॅनमध्ये गंभीर गुन्हयातील पुरावे शास्त्रशुध्दपणे गोळा करण्याकरीता आवश्यक साधन सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच भिवंडी परिमंडळ - 2 मध्ये दाखल होणा-या व 7 वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गंभीर गुन्हयांची उकल होणेकरीता फॉरेन्सिक युनिटचा व फॉरेन्सिक व्हॅनचा उपयोग होणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## पोलीस उपायुक्त कार्यालयात "वेलनेस सेंटर"

पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या भावनिक व मानसिक स्वास्थ्याच्या गरजांकडे लक्ष देण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या संकल्पनेतून भिवंडी पोलीस उपायुक्त कार्यालयीन इमारतीमध्ये 'वेलनेस सेंटर' या उपक्रमाचे उद्घाटन सुध्दा ठाणे अपर पोलीस आयुक्त विनायक देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. पोलीस विभागासोबत आहान फाउंडेशनच्या फाउंडर अँड सीईओ सोनाली पाटणकर,उन्मेश जोशी व स्वप्निल पांगे यांनी संयुक्तपणे हा उपक्रम सुरू केला आहे. आहान फाउंडेशन हा सन 2012 पासून नोंदणीकृत ट्रस्ट असून मुलांच्या व वयस्करांच्या भावनिक आणि मानसिक स्वास्थ्याच्या गरजांकडे लक्ष देण्यासाठी तसेच त्यांना वाढ, विकास आणि मानसिक सक्षमता या साठी संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्य करते.मानसिक आरोग्याविषयी जागरुकता, प्रारंभिक हस्तक्षेप आणि क्षमता वृद्धीवर आधारित संरचित कार्यक्रमांच्या माध्यमातून मुले, व्यक्ती, कुटुंबे आणि समुदाय यांना सक्षम करतात. मुलांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे, समुदायांना महत्त्वाच्या सामाजिक विषयांबाबत संवेदनशील करणे आणि सामूहिक कृतीद्वारे सकारात्मक बदल घडवून आणणे हे ध्येय आहे. आहान फाउंडेशन एकूण पाच राज्यात शासनाबरोबर मानसिक आरोग्य संदर्भातील विविध कार्यक्रम राबवत आहेत. यात प्रामुख्याने रिस्पॉन्सिबल नेटिझम, सायबर वेलनेस सेंटर, ऑटिझम संदर्भात जनजागृती व प्रशिक्षण, मानसिक आरोग्य सेवा हे उपक्रम राबवित आहे. भिवंडी पोलीस उपायुक्त कार्यालयीन इमारतीमध्ये सुरु झालेल्या या वेलनेस सेंटरचे उद्घाटन प्रसंगी पोलीस उपआयुक्त शशिकांत बोराटे, सहायक पोलीस आयुक्त सचिन सांगळे, विजय मराठे तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कर्मचारी,विविध अधिकारी उपस्थित होते.सदर उपक्रमास ठाणे मुख्यालय -1 पोलीस उपआयुक्त डॉ.श्रीकांत परोपकारी यांनी विशेष सहकार्य केले.

# पालघर स्थानकाजवळील नवली उड्डाणपूल नागरिकांसाठी खुला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर, ता. २९ (बातमीदार)** पालघर स्थानकाजवळील नवली फाटक रेल्वे प्रशासनाने बंद केला होता. त्यामुळे पूर्वेकडील नवलीसह परिसरातील अनेक गावांतील लोक, विद्यार्थ्यांना पालघर पश्चिमेकडे येण्यासाठी तीन किमीचा फेरा घालून रेल्वेस्थानकाकडे यावे लागत होते. अनेक अडचणींमुळे उड्डाणपुलाचे काम रखडले होते. आज (ता. २९) हा उड्डाणपूल नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरातील शेकडो नागरिकांना दिलासा मिळाला आहे. रेल्वे फाटकाजवळ रेल्वे प्रशासनाने उड्डाणपूल बांधण्याचे काम सुरू होते; मात्र या कामामध्ये बाधा येत होती. काही दिवसांपूर्वी त्याचे काम पूर्ण झाले होते. त्यामुळे उड्डाणपूल नागरिकांसाठी खुला करावा, यासाठी या भागातील नागरिकांनी अनेक वेळा मोर्चे, आंदोलने केली. हा पूल सप्टेंबरअखेर खुला केला जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे सोमवारी हा पूल जनतेसाठी खुला करण्यात आला आहे. या पुलावरून सद्य:स्थितीत लहान वाहनांसाठी खुला करण्यात आला आहे. नगरसेविका हिंदवी पाटील, वीरेंद्र पाटील व ग्रामस्थांच्या पाठपुराव्यामुळे, तसेच वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या दरबारी, जिल्हाधिकारी, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केल्यामुळे नवली उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले.



# मारहाण करत महिलेचा विनयभंग

## उल्हासनगरात गुन्हा दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर, ता. २९ (वार्ताहर)** उल्हासनगर कॅम्प क्रमांक एक येथील कमला नेहरूनगरमध्ये धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. परिसरातील एका महिलेला श्वानांना जेवण घालण्यावरून मारहाण करत तिचा विनयभंग करण्यात आला. याप्रकरणी अवधेश सिंग या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला रात्रीच्या वेळी धोबीघाट, कमला नेहरूनगर परिसरात भटक्या श्वानांना दूध व टोस्ट खाण्यासाठी देतात. घटनेच्या दिवशी अवधेश सिंग हा श्वानांना मारहाण करत होता. त्याला विरोध केल्यामुळे संतापून त्याने संबंधित महिलेला मारहाण केली, तसेच तिचा विनयभंग केला, अशी फिर्याद उल्हासनगर पोलिस ठाण्यात नोंदवली आहे. याप्रकरणी उल्हासनगर पोलिसांनी अवधेश सिंगविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

## भविष्यवेध



मंगळवार
३० सप्टेंबर २०२५

**मेष**
इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. पूंजी निवेशामुळे लाभ होण्याची शक्यता. आत्मविश्वास वाढेल.खूपच चिंता केल्याने मानसिक शांतात भंग पावेल.

**वृषभ**
चिंता केल्यामुळे प्रकृती बिघडते. शक्य असेल याची काळजी घ्या. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल. संगीतात रूचि वाढेल.

**मिथुन**
व्यापार व्यवसाय चांगला चालेल. विशेष कार्यासाठीची धावपळ लाभदायी सिद्ध होईल. नात्याला मजबुती देण्यासाठी प्रस्ताव ठेऊ शकतात.

**कर्क**
मुलांकडून सुखद बातमी कळेल. ग्राहकांशी संबंध मधुर बनतील. सुख-समृद्धि वाढल्यामुळे थांबलेली कामे वेळेत पूर्ण होतील.

**सिंह**
सहकुटूंब सामाजिक कार्य केल्याने प्रत्येकजण आनंद आणि निवांत राहील. तुमचे अश्रू पुसण्यासाठी एक खास मित्र/मैत्रीण पुढाकार घेण्याची शक्यता.

**कन्या**
व्यवहार कुशलतेतून व्यापारात यशाची शक्यता. नवीन योजनांवर आज कार्य होण्याची शक्यता नाही. जीवनात निराशेचा सूर राहील.

**तुळ**
तुमची जोडीदार तुम्हाला खुश करण्यासाठी आज प्रयत्न करेल. आज तुम्ही घरात राहाल परंतु, घरातील समस्या तुम्हाला चिंतीत करू शकते.

**वृश्चिक**
नोकरीत अधिकाऱ्यांशी वादावाद संभवतात. प्रयत्नाची फळे प्राप्त होतील. सामाजिक क्षेत्र विकसित होईल. व्यापारिक यात्रा लाभप्रद राहील.

**धनु**
स्वत:ला चुस्त तंदुरुस्त ठेवण्यासाठी उच्च कॅलरी आहार टाळा मंगल कार्याची रूपरेखा बनेल. व्यापारात भागीदारी संबंधी कार्य होतील.

**मकर**
वादात भाग्यवर्धक यश. सामाजिक तसेच धार्मिक कार्यक्रमांसाठी उत्तम दिवस आहे कर्मक्षेत्रात तपासपूर्ण कामात यश, धर्म आध्यात्मा संबंधी विशिष्ठ अनुसंधानपूर्ण

**कुंभ**
कामे होतील. यात्रा योग.जवळच्या नातेवाईक किंवा मित्राशी मतभेद असू शकतात. कोणावरही विश्वास ठेवू नका धार्मिक कार्यात वेळ जाईल.

**मिन**
महत्वपूर्ण कामे पूर्ण होतील. आत्मविश्वासाने काम करा. शुभचिंतकांची भेट घडेल. एखाद्या गोष्टीविषयी तणाव असू शकतो.




# मुंब्रातील 'तो' रेल्वे अपघात एका काळ्या बॅगमुळे !

## तीन महिन्यांच्या चौकशी अहवालातून नवी माहिती समोर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मध्य रेल्वेच्यामुंब्रा आणि दिवा स्टेशनदरम्यान ९ जून रोजी सकाळी गर्दीच्या वेळी अपघात होऊन ५ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. तर, आठ प्रवासी जखमी झाले होते. हा अपघात काळी बॅग पाठीला अडकवलेल्या प्रवाशामुळे झाला होता, असे मध्य रेल्वेने म्हटले होते. याप्रकरणाची ३ महिन्यांहून अधिक काळ चौकशी झाल्यानंतर तयार केलेल्या प्राथमिक अहवालातही मध्य रेल्वेने काळया बॅगचेच कारण दिले असून, अपघाताचे गूढ उकलल्याचा दावा केला आहे. या रेल्वे अपघाताची चौकशी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. यासाठी समितीने घटनास्थळी भेट दिली. तसेच, जखमींसोबतच काही प्रत्यक्ष दर्शीचे जबाब नोंदवले. मुंब्रा, दिवा, ठाणे, टिटवाळा आणि कसारा अशा विविध स्थानकांचे सीसीटीव्ही फुटेज, सोशल मीडिया, ई-मेल आणि मोबाइल कॅमेऱ्यांद्वारे जनतेने दिलेल्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. त्यानुसार प्राथमिक अहवाल तयार करण्यात आल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. एका अधिकाऱ्याने 'लोकमत'ला असेही सांगितले की, कुर्ला कार शेड येथे ट्रेनची तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये ५३४१ ए डब्याच्या डाव्या बाजूच्या ठिकाणी दरवाजाजवळ आणि खिडकीच्या ग्रिलवर बॅग आदळल्याने घर्षणाच्या खुणा आढळून आल्या.



### रुळांच्या रचनेत बदल नाही !

अपघात झालेल्या ठिकाणी कोणतेही बदल केले जाणार नाहीत, कारण मध्य रेल्वेवर असे अनेक वळणदार रूळ असून, असा अपघात कधीही झालेला नसल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. या ठिकाणी दोन वळणदार रूळ आहेत. रेल्वेच्या दोन्ही ट्रॅकमधील अंतर ट्रॅकच्या मध्यापासून ५.३ मीटर असते, तर ट्रॅकच्या दोन्ही समोरासमोरील बाजूंपासून ३.६ मीटर असते.


**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ**

टिळकपथ, कल्याण-बदलापूर रोड, अंबरनाथ (प.), ता. अंबरनाथ, जि. ठाणे
www.ambarnathcouncil.net Phone No.: 0251-2682353/18002331106

**अंतिम प्रभाग रचना भौगोलिक सीमा प्रसिध्दी**
**अंबरनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५**
**-: जाहीर सूचना :-**

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणूका घेण्याच्या अनुषंगाने प्रभाग रचनेसंदर्भांत महाराष्ट्र शासनाने दि. १०/०६/२०२५ रोजी आदेश पारित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने प्रभाग रचनेसंदर्भातील टप्पेनिहाय कालबध्द सुधारित कार्यक्रम दि. १४/०८/२०२५ रोजी पारित करण्यात आला आहे.

अंबरनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या प्रभाग रचनेबाबत दि.१४/०८/२०२५ च्या कार्यक्रमानुसार कार्यवाही पुर्ण करुन अंतिम प्रभाग रचना नागरिकांच्या माहितीसाठी नगरपरिषदेच्या नोटीस बोर्ड व संकतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**ठिकाण : अंबरनाथ**
**दिनांक : ३०/०९/२०२५**

***जावक क्रमांक -**
**अंनप/निवडणूक/१९/२०२५-२६**
**दिनांक : २९/०९/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**अंबरनाथ नगरपरिषद**


### खाडीपात्रात पाणी वाढल्याने

# शेकडो म्हशी रस्त्यावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. २९ :** कल्याण खाडीपात्र परिसरात सकाळपासून पावसाचा जोर कायम होता. रात्रीच्या वेळी कल्याण खाडीच्या पाण्याची पातळी वाढल्याने खाडीकिनारी असलेल्या घरात, तबेल्यात पाणी शिरले. यामुळे तबेल्यातील ५०० हून अधिक म्हशी मालकांनी रस्त्यावर आणल्या. या म्हशीमुळे सोमवारी सकाळी गोविंदवाडी बायपासवर वाहतूक कोंडी निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. मागील दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे रविवारी सायंकाळी कल्याण खाडीच्या पाण्याची पातळी वाढली. खाडीकिनारी असलेल्या वस्तीतदेखील मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. या परिसरात सुमारे २० ते २५ तबेले आहेत. सायंकाळी अचानक पाणी पातळी वाढल्याने तबेल्यांमध्ये पाणी शिरले आणि शेकडो म्हशी पाण्यात अडकल्या. पालिका प्रशासन, अग्निशमन दल आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने घरात अडकलेले रहिवासी आणि तबेल्यातील ५०० हून अधिक म्हशींचे रेस्क्यू करण्यात आले. रात्री त्यांना बाहेर काढण्यात आले. खाडीकिनाऱ्यावरील वस्तीत पाणी शिरल्याने येथील रहिवाशांना शाळा, समाजमंदिर तसेच नातेवाइकांच्या घरी स्थलांतरित करण्यात आले; मात्र या म्हशींना ठेवण्याचे कुठे, हा प्रश्न उपस्थित होत असल्याने अखेर या तबेल्यातून बाहेर काढलेल्या ५०० हून अधिक म्हशींना गोविंदवाडी बायपास रस्त्यावर बांधण्यात आले. सकाळी पाणी ओसरले नसल्याने सकाळच्या वेळीदेखील म्हशी रस्त्यावर उभ्या होत्या.

### प्री नॉन-इंटरलॉकिंग कामासाठी

# उद्या कर्जत स्थानकावर ब्लॉक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मध्य रेल्वेवरील मुंबई विभागात कर्जत स्थानकावर प्री नॉन-इंटरलॉकिंग कामासाठी १ ऑक्टोबर रोजी ब्लॉक घेण्यात येणार आहे. ब्लॉक कालावधीत प्रवाशांचा खोळंबा होण्याची शक्यता आहे. कर्जत यार्ड पुनर्रचना कामासंदर्भात कर्जत स्थानकावर प्री नॉन-इंटरलॉकिंग कामासाठी मध्य रेल्वे विशेष वाहतूक ब्लॉक घेतला आहे. हा ब्लॉक २६ सप्टेंबरपासून घेण्यास सुरुवात केली. तर, १० ऑक्टोबरपर्यंत ब्लॉक असल्याची माहिती मिळत आहे. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.२० ते सायंकाळी ५.२० पर्यंत ब्लॉक असेल. हा ब्लॉक भिवपुरी स्थानक नागनाथ केबिन ते कर्जत दरम्यान असेल. या कालावधीत कर्जत डाऊन लोकल सेवा उपलब्ध नसेल. सकाळी ११.२०, दुपारी १२.४० आणि दुपारी २.५५ वाजता सुटणाऱ्या खोपोली- कर्जत लोकल रद्द करण्यात येतील. तसेच - दुपारी १२, दुपारी १.१५ आणि दुपारी ३.३९ वाजता सुटणाऱ्या कर्जत- खोपोली लोकल रद्द करण्यात येतील.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका,ठाणे अनुभवी निविदाकारांकडुन "आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम" या लेखाशिर्षकाअंर्तगत ठाणे १४८ विधानसभा मतदार क्षेत्रातील बाळकुम परिसरातील लोढा कासा,लोढा क्राऊन टॉवर १ ते ७ गृहसंकुलाजवळ आसन व्यवस्था करणे व कचरापेट बसविणे. या कामासाठी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/ निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https:// mahatenders. gov.in/ येथे दि.३०/०९/२०२५ ते दि.०७/१०/२०२५ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.०७/१०/२०२५ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.०८/१०/२०२५ रोजी १६.०० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा/६९८/२०२५-२६
दि२९.०९.२०२५

सही/-
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

सार्व. बांधकाम विभाग या विभागातर्फे ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील "मागासवर्गीय निधी" या लेखाशिर्षका अंतर्गत प्र.क्र.०७ मधील भिमनगर परिसरात विविध स्थापत्य कामे करणे अशा एक कामाकरीता पात्रतेसाठी विनंती निविदा ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि. ३०.०९. २०२५ ते ०७.१०.२०२५ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळावर दि.०७.१०. २०२५ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दिनांक ०९.१०.२०२५ रोजी १६.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-व.प्र.स/७००/२०२५-२६ सही/-
दि:२९.०९.२०२५

कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**


# स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी ठाणे मनपाचा पुढाकार

## ठाणे मनपाच्या चिंतामणराव देशमुख प्रशिक्षण संस्थेचा मुंबई विद्यापीठासोबत करार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२९) :** केंद्र आणि राज्य सरकारमधील भरतीसंदर्भात घेतल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरता ठाणे महानगरपालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेने मुंबई विद्यापीठासोबत करार केला आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत या करारावर मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

ठाणे महापालिकेच्या वतीने आयुक्त सौरभ राव यांनी तर, मुंबई विद्यापीठाच्या वतीने रजिस्ट्रार डॉ. प्रसाद कानडे यांनी या करारावर सह्या केल्या. सोमवारी सायंकाळी मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्याप्रसंगी, महापालिकेचे उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे, संस्थेचे संचालक महादेव जगताप, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे उपस्थित होते.

### ■ हा करार ऐतिहासिक - प्रा. रवींद्र कुलकर्णी

मुंबई विद्यापीठ आणि ठाणे महापालिकेची चिंतामराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था यांच्यात झालेला हा करार ऐतिहासिक आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात अभ्यासक्रमात अनेक प्रकारचे प्रयोग करण्याची संधी उपलब्ध असल्याने अशा प्रकारचा करार करता आला, असे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. पदवीची तयारी करीत असतानाच स्पर्धा परीक्षांच्या तयारीचे प्रशिक्षण मिळाल्याने विद्यार्थी पदवी प्राप्त होताच पूर्ण आत्मविश्वासाने या परीक्षांना सामोरे जाऊ शकतील, असा विश्वास कुलगुरू प्रा. कुलकर्णी यांनी व्यक्त केला.



महापालिका आयुक्त सौरभ राव आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या

### ■ या प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांना थेट लाभ - आयुक्त सौरभ राव

या करारानुसार, ठाणे महानगरपालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेद्वारे विद्यार्थ्यांना चार क्रेडिट देऊ करणारे कोर्सेस सुरू करण्यात येतील, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले. पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेशी निगडित कोर्स पूर्ण केल्यावर क्रेडिट मिळणार आहेत. यूपीएससीसारख्या परीक्षेची तयारी जेवढी लवकर सुरू करता येईल, तेवढे चांगले असते. या प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेमध्ये थेट लाभ होईल, याची खात्री असल्याचे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

### ■ करारात नेमके काय?

यूपीएससी स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्षात उपलब्ध झाल्यास, विद्यार्थी त्यांच्या पदवी अभ्यासक्रमासोबत यूपीएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांचाही अभ्यास करू शकतात. यूपीएससी परीक्षेच्या अभ्यासक्रम पूर्ण करणे व उत्तीर्ण होणे याकरिता विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी चार क्रेडिट मिळणार आहेत. सदर तीन वर्षात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना यूपीएससी या स्पर्धा परीक्षेबाबत अभ्यासक्रमाची तोंडओळख होणार आहे. स्पर्धा परीक्षचे एकूण स्तर, स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम करण्याची कार्यपध्दती, परीक्षेत यश संपादन करणेकरिता आवश्यक सर्व व्यक्तिमत्व कौशल्यांचा विकास करणे, प्रभावी लेखन कौशल्य आणि प्रभावी संभाषण कौशल्य विकसित करणे व इतर आवश्यक बाबीची माहिती, मार्गदर्शन विद्यार्थ्यांना होणार आहे.

### ■ चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था

**अखिल भारतीय पातळीवरील भारतीय प्रशासकीय सेवा (आय.ए.एस.), भारतीय पोलिस सेवा (आय.पी.एस.), आणि इतर संलग्न परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी असल्याने, त्यामध्ये वाढ व्हावी या उद्देशाने ठाणे महानगरपालिकेने सन १९८७ पासून चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेची निर्मिती करण्यात आली. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना निःशुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था आहे. तसेच, अशा पध्दतीने प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे ही एकमेव महानगरपालिका आहे.**

# अंबरनाथ नगरपरिषदेत माहिती अधिकार दिन साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ/दि.29 :** अंबरनाथ नगरपरिषदेमध्ये आज दि. 28 रोजी "माहिती अधिकार दिन" उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व, पारदर्शक व जबाबदार प्रशासन घडविण्यात त्याचे योगदान तसेच नागरिकांच्या हक्कांची जाणीव या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी उमेश राऊत, लेखाधिकारी प्रवीण वडगये, लेखापरीक्षण अधिकारी किरण तांबारे, शहर अभियंता संजय कुंभार यांनी माहिती अधिकार कायद्यामुळे शासनातील पारदर्शकता आणि जबाबदारी वाढल्याचे सांगितले. नागरिकांना माहितीचा हक्क मिळाल्यामुळे लोकशाही अधिक सक्षम झाली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माहिती उपमुख्याधिकारी श्री. उमेश राऊत यांनी केले. शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणाऱ्या माहिती सहाय्यकांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास नगरसेवक, विविध विभागांचे प्रमुख, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बोगस डॉक्टरांकडून उपचार न घेता ; त्यांची माहिती पालिका प्रशासनाला द्यावी

## भिवंडी महापालिकेचे नागरिकांना आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**भिवंडी :** महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागांतर्गत सध्या ०१ बीजीपी दवाखाना व १९ नागरी आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. सदर ठिकाणी बाह्यरूग्ण तपासणी करून औषधोपचार करणेत येत आहे व महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रांमध्ये गरोदर माता तपासणी, गरोदर मातांचे व लहान बालकांचे नियमित लसीकरण, दैनंदिन ओपीडी, मातृत्व योजना, जननी सुरक्षा योजना, साथरोग आजाराचे रूग्णांचे सर्व्हेक्षण व उपचार, मलेरिया सर्व्हेक्षण व प्रतिबंधात्मक उपायोजना तसेच औषधोपचार, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर प्रथमोपचार, पल्स पोलिओ योजना व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम राबविणे इ. रुग्ण सेवा प्रदान केल्या जात आहेत. तसेच राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत शासनस्तरावरून मंजुर ३९ आरोग्यवर्धिनी केंद्रांपैकी (UHWC) १९ केंद्र महानगरपालिकेच्या विविध भागामध्ये कार्यरत असून सदर ठिकाणी बाह्यरूग्ण तपासणी करून औषधोपचार करणेत येत आहे. त्याप्रमाणे १५ वा वित्त आयोगांतर्गत शासनस्तरावरून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये १० हिन्दू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मनपाच्या विविध भागामध्ये कार्यरत आहेत व सदर ठिकाणी बाह्यरूग्ण तपासणी करून औषधोपचार करणेत येत आहे.

नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकाऱ्यांमार्फत मनपा कार्यक्षेत्रामध्ये बेकायदेशिररित्या वैद्यकिय व्यवसाय करणाऱ्या बोगस डॉक्टरांचा शोध घेवून अथवा प्राप्त तक्रारीनुसार त्यांचे विरूध्द महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर ॲक्ट १९६१ चे कलम ३३, ३६ व भारतीय न्याय सहिता कलम ३१८ (४) अन्वये संबंधीत पोलीस स्टेशनकडे बोगस डॉक्टर म्हणून गुन्हा नोंद करणेत येत आहे. माहे जुलै, २०२५ मध्ये ०१ व माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये ०३ अशा एकूण ७४ बोगस डॉक्टरांविरूध्द पोलीसांचे मदतीने गुन्हे दाखल करणेत आलेले आहेत.

दरम्यान, शहरातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर पालिका प्रशासानाची कडक कारवाई सुरु असून नागरीकांनी महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचा लाभा घ्यावा व हा संदेश इतर नागरीकांना/मित्रांना/ नातेवाईकांना द्यावा. तसेच बेकायदेशिररित्या वैद्यकिय व्यवसाय करणाऱ्या इसमां जवळ नागरीकांनी कोणत्याही प्रकारचे औषधोपचार घेऊ नये व बेकायदेशिररित्या वैद्यकिय व्यवसाय करणारे व मनपाकडे नोदणी न रूग्णालय चालवित असल्याचे आढळून आल्यास त्याबाबतची तक्रार महानगरपालिकेकडे करावी, असे आवाहन भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेने केले आहे.

**जुलै, २०२५ मध्ये महानगरपालिकेकडे नोंदणी न करता बेकायदेशिररित्या प्रसुति करीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे ०४ इसमांविरूध्द सदर ॲक्ट अंतर्गत दंडात्मक कारवाई करणेत आलेली आहे. तसेच बेकायदेशिररित्या वैद्यकिय व्यवसाय करणारे बोगस डॉक्टरांवर कारवाई करणेसाठी शासन निर्देशान्वये मनपास्तरावरून पुर्नविलोकन समिती स्थापन करणेत आलेली आहे. -**

**■ (डॉ. संदिप गाडेकर)**
**वैद्यकिय आरोग्य अधिकारी**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**



ठाणे ■ मंगळवार
30 सप्टेंबर 2025
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# घरात वर्तमानपत्रांचे ग्रंथालय तयार करा - खासदार अरविंद सावंत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रभादेवी, ता. २९ (बातमीदार) वर्तमानपत्र हे ज्ञानाचे भांडार आहे, ते जमा करून घरी त्यांचे ग्रंथालय तयार करा. जेव्हा आपल्याला एखाद्या संदर्भाची गरज भासेल, तेव्हा आपण ते वर्तमानपत्र पाहून संदर्भ मिळवू शकू, असा सल्ला खासदार अरविंद सावंत यांनी विद्यार्थ्यांना दिला. शिवसह्याद्री फाउंडेशन आणि 'सकाळ माध्यम समूह' यांच्या संयुक्त विद्यमाने वरळी येथील मराठा मंदिर शाळेत एनआयई उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळेस सावंत यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला. शिवसह्याद्री फाउंडेशनच्या वतीने मराठा मंदिर हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना एनआयई या शैक्षणिक अंकाचे वितरण शुभारंभ करण्यात आले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक किशोर शिंदे, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका वंदना कुंभार, जीवन भोसले, महेश खवनेकर, कृष्णा पाटील आदी उपस्थित होते. खासदार अरविंद सावंत म्हणाले, 'सकाळ'ने विद्यार्थ्यांसाठी 'सकाळ एनआयई' हा अंक सुरू केला आहे. त्याचा हेतू जाणून घ्या, कुठलीही गोष्ट संघर्षाशिवाय मिळत नाही. त्यामुळे 'सकाळ'ने तुमच्यासाठी राबवलेला हा उपक्रम अत्यंत चांगला आहे, याचा फायदा घ्या. या शैक्षणिक सदरामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल, असे शिवसह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष, भारतीय कामगार सेनेचे संयुक्त सरचिटणीस संजय कदम यांनी सांगितले. तर आदित्य ठाकरे यांनीदेखील या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या

# खड्डेमय रस्त्यातूनच होणार देवीचे विसर्जन ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी, ता. २९ :** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महापालिकेकडून रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम करण्यात आले होते, मात्र सततच्या पावसामुळे पुन्हा खड्डे निर्माण होऊन रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. घटस्थापनेच्या दिवशी देवीचे आगमन खड्डेमय रस्त्यातून झाले होते, तर आता दसऱ्याच्या दिवशी विसर्जनही त्याच खड्डेमय मार्गावरून होणार असल्याने भक्तांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. ठाणे-बेलापूर महामार्गावरील अनेक ठिकाणी तसेच शहरातील गावठाणकडे जाणाऱ्या जोड रस्त्यांची मुसळधार पावसाने परिस्थिती बिकट झाली आहे. खड्ड्यांमुळे वाहनचालकांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत असून, अपघातांची शक्यता वाढली आहे. तुर्भे सर्कलजवळ नवीन पुलाचे काम सुरू असताना रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत. दिघा रेल्वेस्थानक, मुकुंद कंपनी, तसेच साठेनगर परिसरात खड्ड्यांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. याशिवाय रबाळे पोलिस ठाण्याजवळील सिग्नल परिसर, ऐरोली कटाई उड्डाणपुलाजवळील भारत बिजली परिसर, ऐरोली सेक्टर-५, गोठीवली, महापे-शिळफाटा रोड, सायन-पनवेल महामार्गावरील तुर्भे उड्डाणपूल, घणसोली उड्डाणपूल तसेच पाम बीच रस्त्याला खड्ड्यांनी अक्षरशः पोखरून काढले आहे. इलठण पाडा, यादव नगर, चिंचपाडा झोपडपट्टी परिसरातील अंतर्गत रस्त्यांचीही चाळण झाली आहे. महापालिका पावसातही तात्पुरते खड्डे बुजवण्याचा प्रयत्न करीत आहे, मात्र सततच्या पावसामुळे दगड आणि माती वाहून जात असल्याने पुन्हा पुन्हा रस्त्यांची अवस्था वाईट होत आहे.

# सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत करणार - मुख्यमंत्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रात पावसामुळे हाहाकार उडाला आहे, राज्याला पावसानं झोडपून काढलं आहे. पावसामुळे शेतकऱ्यांचं अतिप्रचंड नुकसान झालं आहे. पीक तर पुराच्या पाण्यात वाहून गेलंच पण सोबतच शेतातील मातीसुद्धा वाहून गेली आहे. ऐन हाततोंडाशी आलेला घास पावसानं हिरावून घेतल्यानं शेतकरी हातबल झाले आहेत. आता काय करायचं असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. अनेक गावांना पुराच्या पाण्याचा तडाखा बसला आहे. नद्यांना आलेल्या पुरामुळे राज्यातील अनेक गावांचा सर्पंक तुटला आहे. घरादारात पाणी शिरल्यानं संसारोपयोगी साहित्य देखील वाहून गेल्यानं नागरिक रस्त्यावर आले आहेत. शेतीसोबतच घरादाराचं देखील मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान आता नुकसानग्रस्तांचे डोळे सरकारच्या मदतीकडे लागले आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. पावसाचा सर्वाधिक तडाखा हा मराठवाड्याला बसला आहे. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औसा तालुक्यातील उजणी आणि निलंगा तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकासानाची पहाणी केली, यावेळी बोलताना त्यांनी मोठी घोषणा केली आहे. सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत करणार आहोत, कुठेही अधिकचे निकष न लावता आणि आवश्यकता असेल तर निकष शिथिल करून सरकारला नागरिक केंद्रीत मदत करायची आहे. ऑलरेडी आम्ही पैसे रीलीज करायला सुरुवात केली आहे. नुकसानग्रस्तांच्या मदतीसाठी 2 हजार 200 कोटींचा पहिला हाप्ता मंजूर झाला आहे. दिवाळीपूर्वीच सर्व शेतकऱ्यांना मदत मिळेल असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी म्हटलं आहे, यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात आता दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

**परिस्थिती पाहूनच शासन म्हणून मी आपल्याला आश्वस्त करतो, की सर्व निकष बाजूला सारून सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत केली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी केलेल्या या जाहीर घोषणेचे उपस्थित असलेल्या शेतकरी बांधवांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. टंचाईच्या परिस्थिती ज्या उपाययोजना केल्या जातात, तशाच उपाययोजना आता करण्यात येतील. ज्यांच्या घरांचे, दुकानांचे नुकसान झाले आहे, त्यांनाही मदत केली जाणार आहे. २३०० कोटींचा पहिला हप्ता कालच जारी करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट केले आहे. आता या नुकसानीची पाहणी झाल्यानंतर तातडीने ही मदत केली जाईल. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडणार नाही,**

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# नवदुर्गा युवा मंडळ आयोजित "रासरंग" मध्ये महिलांसाठी भोंडला



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन प्रस्तुत आणि श्री नवदुर्गा युवा मंडळ, डोंबिवली आयोजित "रासरंग २०२५" उत्सवामध्ये यंदाही महिला-भगिनींसाठी खास भोंडला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम परंपरागत गरबा-भोंडला उत्सवाच्या भक्तीभाव, आनंद आणि उत्साहाने परिपूर्ण वातावरणात रविवारी साजरा करण्यात आला. यावेळी मराठी अभिनेत्री रुपाली भोसले यांनी या भोंडला कार्यक्रमाला मुख्य उपस्थित लावली आणि महिला भगिनीं समवेत कार्यक्रमाचा आनंद घेतला.

यावेळी उत्सवामध्ये सहभागी महिलांसाठी विविध खेळ आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विजेत्यांना विविध आकर्षक बक्षिसे देऊन गौरवण्यात आले, ज्यामुळे उत्सवातील आनंद आणि स्पर्धात्मक उत्साह दुप्पट झाला.

खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातुन आयोजित करण्यात आलेल्या रासरंग - २०२५ गरबा उत्सवाला मोठ्या संख्येने गरबा रसिक उपस्थित राहून या गरबा उत्सवाचा आनंद घेत आहे. याच अंतर्गत महिलांसाठी दरवर्षीप्रमाणे भोंडला कार्यक्रमाचे रविवारी आयोजन करण्यात आले होते. भोंडला हा पारंपरिक खेळ असून, विशेषतः नवरात्रीच्या सणासोबत साजरा केला जातो. भोंडला खेळात महिलांकडून गटबद्ध पद्धतीने किंवा स्वतंत्रपणे नृत्य केले जाते. प्रत्येक तालावर आणि संगीताच्या लयीत सहभागी महिला सुंदर नृत्य करून उत्सवाच्या रंगात भर घालतात. यामध्ये केवळ नृत्यच नाही तर समूहाची एकात्मता, तालमेल आणि आनंदाची अनुभूतीही महत्त्वाची असते.

याच पार्श्वभूमीवर डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन प्रस्तुत आणि श्री नवदुर्गा युवा मंडळाच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यंदाच्या कार्यक्रमाला मराठी अभिनेत्री रुपाली भोसले उपस्थित होत्या. त्यांनी मुख्य उपस्थिती लावत देवीची आराधना केली तसेच महिला-भगिनींसोबत भोंडला खेळून कार्यक्रमाचा उत्साह दुप्पट केला. त्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण कार्यक्रम अधिकच रंगतदार, संस्मरणीय आणि उत्साहपूर्ण ठरला. महिला भगिनींना दैनंदिन जीवनातून वेळ काढून अशा पद्धतीने उत्सव साजरा करता यावा यासाठी दरवर्षी हा उपक्रम आयोजित करण्यात येतो.

याव्यतिरिक्त उत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम, गायन, नृत्य व विविध सर्जनशील स्पर्धा आयोजित करून महिला-भगिनींच्या प्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते. यंदाही भोंडल्याच्या निमित्ताने महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांनी यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# उल्हासनगरात वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २९ (वार्ताहर)**

शहरातील गजबजलेल्या रस्त्यांवर अचानक वाहतूक पोलिसांची धडक कारवाई सुरू झाली अन् पाहता पाहता वातावरण तापले. हिराघाट परिसरात अवैध पार्किंगवर दंडात्मक कारवाई होताच वाहनचालकांनी पोलिसांना घेराव घालत तीव्र विरोध दर्शवला. पोलिस आणि चालकांत उफाळलेल्या वादामुळे रस्त्यावर तणावाचे आणि गोंधळाचे वातावरण दिसू लागले. शहरातील वाहतूक शिस्त सुधारण्यासाठी सुरू झालेली ही मोहीम प्रत्यक्षात नवे प्रश्न निर्माण करून गेली आहे.

उल्हासनगर शहरात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली वाहतूक कोंडी आणि अव्यवस्था लक्षात घेऊन वाहतूक विभा सतर्क झाला आहे. प्रवीण इंटरनॅशनल हॉटेलपासून सुरू झालेल्या विशेष मोहिमेत फुटपाथ, रस्ते आणि चौकांवर चुकीच्या पद्धतीने उभ्या केलेल्या वाहनांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली. तथापि, ही कारवाई हिराघाट परिसरात पोहोचताच मोठा वाद निर्माण झाला. अवैध पार्किंगवर दंड आकारला जात असताना वाहनचालकांनी पोलिसांना थेट प्रश्न विचारत तीव्र नाराजी व्यक्त केली. या वादातून रस्त्यावर काही वेळ गोंधळ आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले.

वाहतूक पोलिसांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले, की अवैध पार्किंग हीच वाहतूक कोंडीची मुख्य कारणे आहेत.

दररोज तासन्तास लोकांना उशीर होतो, रुग्णवाहिका अडकतात आणि अपघाताची शक्यता वाढते. त्यामुळे कठोर कारवाई करणे अपरिहार्य झाले आहे, असे अधिकाऱ्यांनी नमूद केले; मात्र वाहनचालकांची वेगळीच तक्रार आहे. त्यांचा आरोप आहे, की कारवाई मनमानी पद्धतीने केली जात असून, सर्वसामान्य नागरिकांना केवळ दंड आकारून त्रास दिला जात आहे. योग्य पार्किंगची सुविधा न देता थेट दंड ठोठावणे हा अन्याय आहे, असे वाहनचालकांनी सांगितले.

# पनवेल मनपा 'अभय योजने'चा आज शेवटचा दिवस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. २९ (बातमीदार)** पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या वाढत्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्तीमध्ये अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती. मंगळवार (ता. ३०) पर्यंत शास्तीवरती ९० टक्के सूट राहणार आहे. नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे. नागरिकांच्या वाढत्या मागणीनुसार अभय योजनेंतर्गत शास्तीवरील ९० टक्क्यांची सूट मंगळवारपर्यंत वाढविण्यात आली आहे. ही अंतिम मुदतवाढ असून या योजनेचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे. महापालिकेकडून नागरिकांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन देण्यात आले आहे. करदात्यांनी ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यामुळे थेट दोन टक्के सवलत मिळू शकते. तसेच ऊर्जा बचत करणारे सौर पॅनेल, वॉटर हार्वेस्टिंग अशा उपाययोजना केल्यास करामध्ये दोन टक्के सवलत दिली जाणार आहे. याशिवाय घनकचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट करणाऱ्या सोसायट्यांना नियमानुसार करात सवलती मिळणार आहे. कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महापालिकेचे panvelmc.org हे संकेतस्थळ तसेच PMC Tax App आणि Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे करदात्यांना घरबसल्या ऑनलाइन कर भरण्याची सुविधा मिळत आहे. अभय योजनेंतर्गत शास्ती माफीमधील ही अंतिम मुदतवाढ लक्षात घेऊन नागरिकांनी थकबाकी त्वरित भरून दिलेल्या शास्ती माफी व सवलतींचा लाभ घ्यावी, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

# पुरग्रस्तांच्या मदतीला धावला सिद्धिविनायक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अतिवृष्टीचं संकट ओढावलेलं आहे. हजारो एकरावरील शेतजमिनींचं प्रचंड नुकसान झालं आहे. उभी पीक वाहून गेली आहेत, यामुळे शेतकरी प्रचंड हतबल झाला आहे. तर सरकारही युद्धपातळीवर कामाला लागलेलं आहे. तर, मदतीचाही ओघ सुरू झालेला आहे.

प्रशासकीय यंत्रणा थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन, तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करत आहेत. दुसरीकडे सर्वच आमदार, मंत्री नेते हे नुकसानाग्रस्त भागाचीं पाहणी करत आहे. या पावसामुळे अनेक ठिकाणी पूर देखील आला आहे. परिणामी केवळ शेतीचेच नाहीतर, राहत्या घरांचं गुरा-ढोरांचंही प्रचंड नुकसान झालं आहे. कित्येकांचे संसार उघड्यावर आले आहे.

अशावेळी या संकटातून सावरण्यासाठी सरकारकडून होईल ती मदत केली जात आहे. तर अनेकजण मुख्यमंत्री सहायता निधीतही मदत निधी जमा करत आहेत, अनेक सेलिब्रिटींनी मदतीसाठी आवाहनही केले आहे. याच पार्श्वभूमीवर आता मुंबईतील श्री सिद्धिविनायक ट्रस्टकडून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी तब्बल दहा कोटींचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# पीएच.डी. संशोधनासाठी भावेश करपट यांची निवड



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** कळंभोण गावचे रहिवासी प्रा. भावेश करपट यांनी अत्यंत बिकट आर्थिक परिस्थिती आणि घरगुती अडचणींवर मात करून शिक्षणाच्या माध्यमातून यशाची उंच भरारी घेतली असून त्यांची मुंबई विद्यापीठात पीएच.डी. संशोधनासाठी निवड झाली आहे. प्रा. भावेश करपट यांचे प्राथमिक शिक्षण लेंडीपाडा गावात, माध्यमिक शिक्षण गणेशपुरी, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, वज्रेश्वरी येथे झाले. त्यानंतर पदवी शिक्षण स्वामी वाडा कॉलेज तर पदव्युत्तर शिक्षण के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक येथे 2020 मध्ये झाले. त्याच वर्षी त्यांनी महाराष्ट्र राज्यस्तरीय सेट परीक्षा उत्तीर्ण केली. 2021 ते 2024 या कालावधीत त्यांनी अंबिकाबाई जाधव महिला महाविद्यालय, वज्रेश्वरी येथे प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. संशोधनाची आवड जपताना त्यांनी आदिवासी संस्कृतीवर आधारित पाच संशोधन पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित केले आहेत.

नोव्हेंबर 2024 मध्ये झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेश परीक्षेत त्यांनी अनुसूचित जमाती प्रवर्गातून प्रथम क्रमांक मिळवला, तसेच मार्गदर्शकांच्या सहकार्यामुळे त्यांची संशोधनासाठी निवड झाली असून ते "पद्मश्री जिव्या सोमा म्हसे यांच्या वारली चित्रकलेच्या विकासातील ऐतिहासिक योगदान" या विषयावर संशोधन करीत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल परिसरातून प्रा. भावेश करपट यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# नदी पात्रात गाळ
## ठाण्यात मंगळवारपर्यंत अपुरा पाणीपुरवठा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२९) :** भातसा धरण क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे ठाणे महापालिकेच्या पिसे पंपिंग स्टेशन येथील नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ, कचरा व झाडांच्या फांद्या जमा झाल्या आहेत. त्यामुळे गेल्या दोन दिवसापासून पूर्ण क्षमतेने पंपिंग करण्यात अडचणी येत आहेत. तसेच, पाण्यातील अतिरिक्त गढूळपणामुळे शुद्धीकरणाच्या प्रक्रियेवरही परिणाम होत आहे. या सगळ्यामुळे ठाणे महापालिका क्षेत्राकडे कमी प्रमाणात पाणी पुरवठा येत आहे. त्यामुळे मंगळवारपर्यंत नागरिकांना अपुऱ्या प्रमाणात व अनियमित पाणीपुरवठा होईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

पिसे येथील पंपाच्या स्टेनरमधील गाळ, कचरा, झाडाच्या फांद्या काढण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात येत आहे. तरी नागरिकांनी कृपया या काळात पाण्याचा वापर जपून करावा आणि महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कल्याण आरपीएफच्या पथकाने पकडला ५७ किलो गांजाचा साठा




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण आरपीएफ (रेल्वे संरक्षण दल) च्या सीआयबी (गुन्हे अन्वेषण शाखा) पथकाने हावडा मेलमधून गांजाचा मोठा साठा जप्त करत एका आरोपीला अटक केली आहे. सीआयबी टीमच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, रविवारी हावडा मेलच्या एम-२ बोगीमध्ये तीन ट्रॉली बॅग संशयास्पद अवस्थेत आढळल्या. कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी बॅग्सबद्दल विचारणा केली असता, तेथे उपस्थित प्रवाशांनी त्या बर्थ क्रमांक-७५ वरील प्रवाशाच्या असल्याचे सांगितले. सीआयबी टीमने मोहम्मद इरफान नावाच्या प्रवाशाकडे चौकशी केली असता, तो टाळाटाळ करू लागला. जेव्हा सूटकेसची तपासणी करण्यात आली, तेव्हा गांजाचा मोठा साठा सापडला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, गांजा तस्कर मोहम्मद इरफान समीर मोहम्मद (२४), हा वर्धमान, बंगालचा रहिवासी आहे आणि तो हा गांजा घेऊन दादरला जात होता.

कल्याण सीआयबी पथकाने गांजा असलेल्या तिन्ही ट्रॉली बॅग जप्त करून मोहम्मद इरफानला ताब्यात घेतले. जप्त केलेला माल दादर स्टेशनवर उतरवल्यानंतर मुंबईतील अमली पदार्थ विभागाशी संपर्क साधण्यात आला आणि पुढील तपासासाठी मुंबई एनसीबी (नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो) चे निरीक्षक अमोल मोरे यांच्या पथकाच्या हवाली करण्यात आला. सध्या आरोपीला ताब्यात घेऊन एनसीबीचे पथक या प्रकरणाचा तपास करत आहे.



उत्सव नवरंगांचा : - ठाणे महानगर पालिका अधिकारी - कर्मचारी आणि लघुलेखीका




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024